वाचले:- १)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय वाकड यांच्याकडील दि.२७/०१/२०२२ चे पत्र
४)दि.०४/०२/२०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५६/२०२२
दि.०४/०२/२०२२

विषय –नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक)
सं.क्र. ७४०३

आदेश,

श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.३०/०९/१९९८ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांची जन्म तारीख ०२/०२/१९६४ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-०१/०२/२०२२ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांना २८/०२/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.

तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील र.रू.३०००००/- (अक्षरी- तीन लाख फक्त) कर्ज येणे बाकी आहे असे माध्यमिक शिक्षण पतपेढी यांच्याकडील दाखला क्र.५१/२०२१-२२ दि.२०/१२/२०२१ अन्वये दिसून येत आहे.त्यानुसार श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या देय रक्कमेतून र.रू.३०००००/-(अक्षरी-तीन लाख फक्त) माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांना अदा करणेत यावे.तसेच भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांनी मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

तसेच श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत ०३/०७/१९९५ ते ०६/१०/१९९८ अखेर सेवासातत्य देण्यात आलेले असून सदर कालावधीचा फरक र.रू.२,२५,०७०/- (अक्षरी-दोन लाख पंचवीस हजार फक्त) श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करणेत आलेले आहे.

तथापि,मा.आयुक्त सो.यांच्याकडील आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि.१८/१२/२००७ अन्वये दिलेल्या सेवासातत्य व फरकावरील रक्कमेस लेख परिक्षण विभागाने आक्षेप घेतलेले आहेत.त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभागाने र.रू.२,२५०७०/- वसुल करणेबाबत श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांना पत्र बजावणेत आलेले असल्याने श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्याकडे याचिका क्र.३८२३/२०२१ दाखल केलेली आहे.

सबब,मी उप आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये दिनांक - २८/०२/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. व लेखापरीक्षण आक्षेप वसुली रु. रु. २,२५०७०/- बाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्याकडे याचिका क्र.३८२३/२०२१ अंतिम निर्णय आलेनंतर वसुली बाबत

अंतिम निर्णय घेणेत येईल. श्री. जरांडे यांचे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, गट विमा इ. रक्कमा अदा करणेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.जरांडे पंढरीनाथ भागुजी (सहाय्यक शिक्षक)
माध्यमिक विद्यालय वाकड
प्रत:- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय वाकड
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(रोहिणी शिंदे)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.